# ***//श्रीयंत्र महात्म्य //***

*जो जे वांछिल तो ते लाहो...*

***प्रास्ताविक :-***

*हिंदू संस्कृती ही जगातील अतिप्राचीन आणि वंदनीय संस्कृतींपैकी एक आहे. जिने आदर्श मानवी जीवन जगण्याकरता विशिष्ट पध्दती विकसीत केल्या. दैनंदिन कामांकरता हिंदू धर्मशास्त्रात विविध उपासना आणि साधना सांगितल्या आहेत.यातील काही उपासनांचे फल आपल्याला दीर्घ काळाने मिळते; तर काही साधना शीघ्रफलदायी असतात. अशीच् एक अद्भुत साधना आहे '**श्रीयंत्र साधना**'.*

*आपल्या मनात नेहमी अनेक इच्छा निर्माण होत असतात. कोणाला धनप्राप्तीची इच्छा असते, तर कोणाला पुत्रप्राप्तीची. कुणी मन:शांती शोधत फिरतो, तर कुणी समृध्दीच्या. अशा समस्त भक्तगणांच्या सर्व संकटांचा नाश श्रीयंत्र करते. अशा या सर्वसुखदायी श्रीयंत्राची महती जाणून घेऊ या. याकरता हिंदू धर्मात मंत्र आणि यंत्र या साधनांचा उपयोग केला गेला आहे.*

## ***मंत्र***

*मंत्र हा काही विशिष्ट शब्दांचा समुह असतो. कोणाही व्यक्तीने त्याचे वारंवार मनन आणि उच्चारण केल्याने त्या व्यक्तीच्या मनोकामना पूर्ण होतात. प्रत्येक मंत्राची स्वत:ची अशी एक खास अधिष्ठात्री देवता असते. तिची संपूर्ण शक्ती त्या मंत्रात एकवटलेली असते.*

*मंत्रे देव प्रगटती । मंत्रे भूते अखरकिती ।*

*बाजीगरी वोडंबरी करिती । मंत्रसामर्थ्ये ॥*

*मंत्री संग्राम देवाचा । मंत्री साभिमान ऋषीचा ।*

*महिमा मंत्रसामर्थ्याचा । कोण जाणे ॥*

*मंत्री पक्षी आटोपिती । मूशके स्वापदे बांधती ।*

*मंत्री माहांसर्प खिळिती । आणी धनलाभ ।।*

*असे मंत्रसामर्थ्याचे सार्थ वर्णन समर्थ रामदासांनी आपल्या दासबोध ग्रंथात करुन ठेवले आहे. असेच मंत्रसामर्थ्य हे श्रीयंत्राच्या*

***''ॐ श्री ऱ्हीं क्लीं हीं महालक्ष्म्यै नमः। ''***

*या एकाच् मंत्रात असते. मंत्रोच्चाराची ही शक्ती कधीही नष्ट होत नाही. ती नेहमीच् जागृत असते. इथे मंत्राच्या जोडीला यंत्राचीही माहिती घेणे गरजेचे ठरते.*

## यंत्र

*ऋषीमुनींनी सांगितलेल्या अनेक साधनांपैकी यंत्रसाधना हा सर्वांना करता येण्याजोगा सरळ व सोपा उपाय आहे. प्रत्येक यंत्र हे प्रत्यक्षात त्या त्या देवतेचे निवासस्थान असते. या कलीयुगात ईश्वराचे दर्शनकोणासही होऊ शकत नाही, असं पुराणात लिहीलयं. परंतु यंत्र रूपाने त्याचे वास्तव्य आपणास घडू शकते. मंत्राप्रमाणेच् यंत्रातही देवतांची शक्ती संग्रहीत असते. आत्मा आणि शरीराप्रमाणेच् देवता आणि यंत्र एकमेकांपासून वेगळे करता येत नाही. श्रीयंत्राचे केवळ दर्शन घेतले तरी माणसाच्या मनोकामना पूर्ण होतात. यंत्र सर्व सिध्दींचे द्वार आहे. ते सर्व देवतांचे निवासस्थान आहे. यंत्र म्हणजे मंत्राचे रचनात्मक शरीर आहे. मंत्राप्रमाणेच् यंत्रातही प्रचंड,अद्भूत शक्ती सामावलेली असते. म्हणून यंत्रसाधना ही सर्वात सोपी आणि तत्काळ फल देणारी साधना मानली जाते.*

## श्रीयंत्र

*हिंदू धर्मशास्त्रानुसार सर्व यंत्रामध्ये 'श्रीयंत्र' हे सर्वश्रेष्ठ असून त्याशिवाय मनुष्याला तरणोपाय नाही; असे मानले जाते.ब्रम्हांडपुराणातील उल्लेखाप्रमाणे, जिच्या गर्भात तेहतीस कोटी देवीदेवतांचा वास आहे अशा श्रीमहालक्ष्मीचे हे*

*निवासस्थान आहे. म्हणूनच् श्रीयंत्राची पुजा करणाऱ्यास विश्वातील समस्त देवीदेवतांची पुजा केल्याचे पुण्य लाभते.*

**रचना:-**

*श्रीयंत्रात अत्यंत अद्भूततऱ्हेने संपूर्ण ब्रम्हांडाची संरचना करण्यात आली आहे. याकरता विशिष्ट पध्दतींचा वापर करून अनेक भौमितीक रचना एकमेकांत गुंफण्यात आल्या आहेत.या यंत्रातील नऊ चक्रे ही मनुष्यदेहातील नऊ आध्यात्मिक चक्रांसमान आहेत.ज्यामुळे अनेक साधनांचे पुण्य या एकाच् साधनेमुळे प्राप्त होते.*

*श्रीयंत्राचे भूपृष्ठ,कच्छपृष्ठ आणि मेरूपृष्ठ असे मुख्य प्रकार असून त्यातील मेरूपृष्ठ शीघ्रफलदायी असते. तसेच् श्रीयंत्रे विविध वजनांची असतात परंतु अखंड व जास्त वजनाचे श्रीयंत्र प्रभावी मानले जाते.*

**शक्तीपीठे:-**

*श्रीयंत्राच्या शक्तीची १०८ पीठस्थाने असून ती बलुचिस्तानपासून ते आसामपर्यंत आणि काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंत पसरलेली आहेत.*

*१)पूर्णपीठ कामपीठ-अचलेश्वर मंदीर, माउंट अबू*

*२)पूर्णगिरी पीठ-पुनागर माता मंदीर,पाली*

*३)उड्डियान पीठ-अंबाजीचे मंदीर,गिरनार*

*४)सप्तश्रुंगी पीठ-सप्तश्रुंगी देवी मंदीर,वणी,नाशिक*

*ही प्रमुख चार पीठस्थाने असून एका श्रीयंत्र पुजनाने ह्या सर्व स्थानांवरील पुजेचे पुण्य मिळते.*

## श्रीयंत्र प्रभाव

- *श्रीयंत्र हे अत्यंत प्रभावी असे यंत्र आहे.*
- *श्रीयंत्राच्या नुसत्या अस्तित्वाने सभोवतालचे वातावरण शुध्द आणि मंगलमय होते.*
- *ज्या घरात हे यंत्र असते त्या घरात नेहमी समृध्दी नांदते.*

- *या यंत्रामुळे विद्या ,शक्ती, यश, मानसन्मान,ऐश्वर्य प्राप्त होते.*
- *या यंत्रामुळे  सर्व प्रकारचे भय नाहीसे होते.*
- *या यंत्रामुळे दु:ख,त्रास, साडेसाती आदी संकटांपासून मुक्ती मिळते.*
- *या यंत्रामुळे सर्व मनोकामनांची पुर्ती होते आणि आनंदी जीवन प्राप्त होते.*
- *तसेच् या यंत्रामुळे मानवाचे अंतिम ध्येय म्हणजे मोक्षप्राप्ती होते.*
- *श्रीयंत्र म्हणजे**'सर्व संकटातून मुक्त होऊन यशाकडे जाण्याचा राजमार्ग'** आहे.*

## उपसंहार

. *ज्या घरात श्रीयंत्र असते त्या घरात सतत माझा वास असतो आणि तेथे मी सर्व सुखशांती प्रदान करते असे  श्रीमहालक्ष्मीने स्वत: पद्मपुराणात कथन केले आहे. तरी अशा तऱ्हेने हिंदू धर्मशास्त्राचा परिपाक असणारे श्रीयंत्र हे प्रत्येक हिंदू माणसाच्या घरात असलेच् पाहिजे. जेणेकरून आपण व आपले कुटूंबीय आणि सर्व समाज आनंदी व सुखी होईल.*

***आमच्याकडील श्रीयंत्राची वैशिष्ट्ये:-***

*१) त्रिमीतीय् आकार*

*२)अखंड पंचधातूमध्ये उपलब्ध*

*३)शास्त्रोक्त पध्दतीने घडविलेले*

*४)अनेक वजनात उपलब्ध*